महिला व बालविकास विभाग

जिल्हा परिषद- जळगाव

**महिला समुपदेशन केंद्र सुरू करणे साठी फेर जाहिरात**

जिल्हा परिषद महिला व बाल विकास विभागामार्फत जिल्ह्यातील ग्रामीण भागासाठी महिला व बाल विकासाशी संबंधित कार्यक्रम राबविले जातात. जिल्हा परिषद क्षेत्रात महिला व बाल कल्याण समितीमार्फत जिल्हा परिषद उत्पन्नाच्या १० % निधीतून गट "अ" प्रशिक्षण आणि सक्षमीकरणाच्या योजना अंतर्गत समुपदेशनासाठी महिला समुपदेशन केंद्र योजना राबविण्यासाठी नोंदणीकृत पात्र संस्थाकडून अर्ज मागविण्यात येत आहे. सदरचे प्रस्ताव जाहिरात **प्रसिद्ध झाले पासून** सात दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत सादर करावे. मुदतीनंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

महिला व बालकांवर होणाऱ्या अत्याचारास प्रतिबंध करून त्यांना मदत उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद-जळगाव मार्फत महिला समुपदेशन केंद्रे सुरू करण्यात येणार आहे.

**जळगाव जिल्ह्यात महिला समुपदेशन केंद्र सुरू करण्यासाठी प्रस्ताव मागविण्या बाबत**

उपरोक्त ठिकाणी महिला समुपदेशन केंद्रे सुरू करण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात येत असून त्यासाठीचे निकष पुढीलप्रमाणे आहेत.

1. संस्था नोंदणी अधिनियम, 1860 व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अंतर्गत संस्थेची नोंदणी असणे आवश्यक आहे, तसेच नोंदणी प्रमाणपत्र वैध व मुदतीत असावे.
2. संस्था महिला व बाल विकासाच्या क्षेत्रात आणि महिला व बालकाच्या समुपदेशनाचा किमान 3 वर्षाचा अनुभव असलेली असावी.
3. समुपदेशनाचे आवश्यक व्यवसायिक कौशल्य असणारा प्रशिक्षित कर्मचारी वर्ग संस्थेकडे उपलब्ध असावा.
4. वर्षभर समुपदेशन केंद्राचा खर्च भागविण्याची संस्थेची आर्थिक क्षमता असावी. यापूर्वी प्रस्ताव सादर केलेल्या संस्थांनीही पुन्हा नव्याने प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.
5. जळगाव जिल्ह्यातील तसेच महिला पदाधिकारी असलेल्या संस्थेस प्राधान्य देण्यात येइल.
6. संस्थेची निवड प्रथम एक वर्षासाठी असेल व काम समाधानकारक असल्यास पुढे निधीच्या तसेच योजना मंजुरीच्या अधीन राहून मुदतवाढ देण्याचा विचार करण्यात येईल.
7. मुदतवाढ न दिल्यास कुठलेही अनुदान दिले जाणार नाही.
8. संस्थेच्या कामकाजाचे नियमित मूल्यमापन केले जाईल. कामकाजात त्रुटी आढळल्यास, योजना चुकीच्या पद्धतीने राबविल्यास तसेच गैरवापर झाल्यास मान्यता रद्द करण्यात येईल व प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.
9. ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन - शासन निर्णय दिनांक २४ जानेवारी २०१४ व दिनांक १९ जानेवारी २०२१ तसेच वेळोवेळी सुधारित प्राप्त सूचना व या कार्यालयाने दिलेले आदेश बंधनकारक राहतील.

आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह आपला अर्ज व परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास) जिल्हा परिषद जळगाव, नवीन प्रशासकीय इमारत, बळिराम पेठ, जळगाव येथे प्रस्ताव तीन प्रतींमध्ये सादर करावे.

**या योजनेअंतर्गत मान्यता व अनुदान मिळण्यासाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे :**

वरीलप्रमाणे अर्हता असणाऱ्या पात्र इच्छुक संस्थांनी खालील अटी व शर्ती संबंधित कागदपत्रे तसेच खालील प्रमाणपत्रे, कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे .

1. विहीत नमुन्यातील अर्ज
2. संस्थेची संक्षिप्त माहिती
3. संस्थेच्या योजना व कार्याबाबतचा मागील 3 वर्षांचा वर्षनिहाय वार्षिक अहवाल
4. संस्थेचा मागील तीन वर्षाचा सनदी लेखापालांची स्वाक्षरी असलेला वर्षनिहाय लेखा परीक्षण अहवाल
5. संस्थेने समुपदेशनाचे कार्य केल्याबाबतचा कार्याचा स्वतंत्र अहवाल सांख्यिकी माहितीसह
6. संस्थेचे मागील तीन महिन्यांचे माहिना निहाय बँक स्टेटमेंट

7. संस्था नोंदणी अधिनियम, 1860 आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राच्या छायांकित व साक्षांकित प्रती
8. संस्थेच्या निती पोर्टलवरील नोंदणी क्रमांक व घटना व नियमावली
9. संस्थेची घटना व नियमावलीची साक्षांकित प्रत ज्यामध्ये महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालवणे हा उद्देश असावा.
10. संस्थेच्या कर्मचारी वर्गाचे शैक्षणिक पात्रता व अनुभवाचे प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती जोडाव्यात.
11. संस्थेने वेळोवेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे छायाचित्र/कागदपत्रे / वृत्तपत्रातील कात्रणे जोडावीत,
12. संस्थेच्या कार्यरत पदाधिकारी व कार्यकारिणीचे नाव, पत्ता, व्यवसाय व दूरध्वनी क्रमांकासह यादी जोडावी.
13. संस्थेच्या कार्यकारी मंडळातील सदस्य एकमेकांचे नातेवाईक नाहीत तसेच कोणीही सदस्य शासकीय सेवेत नाहीत याबाबतचे हमीपत्र सोबत जोडावे.
14. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांबाबत घटना व नियमावली सादर करावी
15. संस्थेने वेळोवेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे छायाचित्र/कागदपत्रे/ वृत्तपत्रातील कात्रणे जोडावीत,
16. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांबाबत (अध्यक्ष व सचिव) स्वाक्षरीचे संस्थेच्या नावाने संस्थेबाबत जनसामान्यांच्या तक्रारी नाहीत; संस्थेबाबत गैरव्यवहारीच्या तक्रारी नाहीत तसेच संस्थेने सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नाही या बाबत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
17. इच्छुक संस्थानी विहीत नमुन्यातील अर्जासाठी व योजनेच्या तपशीलवार माहितीसाठी जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास) जिल्हा परिषद जळगाव यांच्याशी संपर्क साधावा.
18. यापूर्वी केंद्र मंजूर संस्थांनी पुनश्च अर्ज करावा.
19. सर्व हमीपत्र संस्थेच्या लेटर हेडवर मुद्रित असावीत. प्रस्तावाला पृष्ठांकन असावे. प्रत्येक पृष्ठावर संस्थेचा शिक्का असावा.

इच्छुक संस्थानी विहित नमुन्यातील अर्जासाठी व योजनेच्या तपशीलवार माहितीसाठी जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास विभाग) जिल्हा परिषद जळगाव यांच्याशी संपर्क साधावा .

२०) प्रस्ताव सोबत समुपदेशन केंद्र संबंधी दिलेल्या जाहिराती नुसार अर्जा सोबत सादर केलेली माहिती व सोबत जोडलेली दाखले ही खरी असून भविष्यात चुकीची, खोटी तसेच दिशाभूल करणारी असलेचे निदर्शनास आल्यास समुपदेशन केंद्राची मंजूरी कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्यात येईल याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील या बाबत प्रस्तावा सोबत हमीपत्र सादर करावे.

महिला व बालविकास विभाग

जिल्हा परिषद- जळगाव

महिला समुपदेशन केंद्र अर्जाचा नमुना

अर्जदार संस्थेचे नाव
पत्ता
दिनांक

प्रति,

जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास),
जिल्हा परिषद, जळगाव.

विषय- महिला समुपदेशन केंद्र प्रस्ताव सादर करणेबाबत.

महोदय,

महिला व बालकांवर होणाऱ्या अत्याचारास प्रतिबंध करून त्यांना मदत उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद-जळगाव मार्फत महिला समुपदेशन केंद्रे सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी संस्थेचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| **तपशील** | संस्थेची माहिती | शेरा |
|---|---|---|
| 1. संस्थेचे नाव- | | |
| 2. पत्ता<br>Phone Number<br>Email<br>Website | | |
| 3. संस्था नोंदणी अधिनियम, 1860 व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अंतर्गत संस्थेची नोंदणी क्रमांक – दिनांक – प्रत जोडावी | | |
| 4. संस्थेची घटना व नियमावलीची साक्षांकित प्रत | | |
| 5. संस्थेच्या निती पोर्टलवरील नोंदणी क्रमांक व घटना व नियमावली | | |
| 6. संस्थेचे पदाधिकारी तपशील जोडावा – संस्थेच्या कार्यरत पदाधिकारी व कार्यकारिणीचे नाव, पत्ता, व्यवसाय व दूरध्वनी क्रमांकासह यादी जोडावी. | | |
| 7. संस्थेच्या कार्यकारी मंडळातील सदस्य एकमेकांचे नातेवाईक नाहीत तसेच कोणीही सदस्य शांसकीय सेवेत नाहीत याबाबतचे हमीपत्र सोबत जोडावे. | | |
| 8. योजना सुरू करणेबाबत संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा ठराव | | |
| 9. योजनेस मान्यतेनंतर अनुदान स्वीकारून खर्च करू | | |

| | | |
|---|---|---|
| शकणाऱ्या पदाधिकाऱ्याच्या नावाचा संस्थेचा ठराव त्याचे नाव, पदनाम, हुद्दा | | |
| 10. संस्थेचा मागील तीन वर्षाचा सनदी लेखापालांची स्वाक्षरी असलेला वर्षनिहाय लेखा परीक्षण अहवाल | | |
| 11. योजना व कार्याबाबतचा मागील 3 वर्षांचा वर्षनिहाय वार्षिक अहवाल<br>अनुभव- संस्था महिला व बाल विकासाच्या क्षेत्रात किमान 3 वर्षाचा अनुभव असलेली असावी. | | |
| 12. संस्थेने समुपदेशनाचे कार्य केल्याबाबतचा कार्याचा स्वतंत्र अहवाल सांख्यिकी माहितीसह | | |
| 13. बँक खात्यावरील शिल्लक -<br>संस्थेचे मागील तीन महिन्यांचे माहिना निहाय बँक स्टेटमेंट | | |
| 14. वर्षभर समुपदेशन केंद्राचा खर्च भागविण्याची संस्थेची आर्थिक क्षमता असावी | | |
| 15. समुपदेशनाचे आवश्यक व्यवसायिक कौशल्य असणारा प्रशिक्षित कर्मचारी वर्ग संस्थेकडे उपलब्ध आहे का? | | |
| 16. असल्यास तपशील- संस्थेच्या कर्मचारी वर्गाचे शैक्षणिक पात्रता व अनुभवाचे प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती जोडाव्यात. | | |
| 17. Whether the organization has ever been blacklisted? (Yes/No)<br>If yes, Details - | | |
| 18. संस्थेने वेळोवेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे छायाचित्र/कागदपत्रे/ वृत्तपत्रातील कात्रणे जोडावीत | | |
| 19. संबधित इतर माहिती | | |

टीप - प्रस्ताव सोबत समुपदेशन केंद्र संबंधी दिलेल्या जाहिराती नुसार अर्जा सोबत सादर केलेली माहिती व सोबत जोडलेली दाखले ही खरी असून भविष्यात चुकीची , खोटी तसेच दिशाभूल करणारी असलेचे निदर्शनास आल्यास समुपदेशन केंद्राची मंजूरी कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्यात येईल याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील या बाबत प्रस्तावा सोबत हमीपत्र सादर करावे .

सही व संस्थेचा शिक्का